**BDC LIBRARY**

**News Paper Clipping**

**A.Y. 2025-26**

# शिवाजी विद्यापीठ नियतकालिक स्पर्धेत पाटणच्या विद्यार्थ्यांचे यश

लोकमत न्यूज नेटवर्क

**पाटण** : शिवाजी विद्यापीठाच्या नियतकालिक स्पर्धेत बा.दे. कॉलेज, पाटणच्या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. शिवाजी माने याने द्वितीय क्रमांक मिळवला तर विनोदी लेख प्रकारात सुप्रिया शिंदे हिने दुसरा क्रमांक पटकावला. हिंदी विभागातून ललित लेख या प्रकारातही त्याने तिसरा क्रमांक मिळविला. व्यंगचित्र या प्रकारात मंगेश सोनावले याने प्रथम तर देवयानी जमदामडे हिने दुसरा क्रमांक मिळविला.

प्रा. डॉ. पांडुरंग ऐवळे, प्रा.डॉ. विनायक राऊत, प्रा. गणेश गायकवाड तसेच हिंदी विभागाचे प्रमुख प्रा.डॉ. विनायक कुरणे व प्रा.डॉ. हेमलता काटे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. यशाबद्दल माजी मंत्री विक्रमसिंह पाटणकर, जिल्हा बँकेचे संचालक सत्यजितसिंह पाटणकर, डॉ. सोपानराव चव्हाण यांनी कौतूक केले.